DRAFT

## स्पर्धेचे नियम

१) स्पर्धा शुल्क रु. १५०/– पेक्षा कमी असल्यास अर्ज स्वीकारला जाणार नाही.

२) अपरिहार्य कारणास्तव स्पर्धेची तारीख, स्पर्धा केंद्र तसेच स्पर्धेची वेळ बदलण्याचा अधिकार फक्त श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाकडे राहील.

३) कोणत्याही प्रकारे कॉपीचा प्रकार आढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्यांना स्पर्धेतून बाहेर केले जाईल.

४) एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत दिले जाणार नाही. ग्रंथ परत घेतला जाणार नाही. एका विद्यार्थ्याऐवजी दुसऱ्या विद्यार्थ्याचे नाव घेतले जाणार नाही.

५) विद्यार्थी किंवा पालकांना तक्रार करावयाची असल्यास ती कार्यवाह, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे यांचेकडे लेखी स्वरुपात करावी. कार्यवाह, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.

**या स्पर्धेचा हेतू स्पर्धा किंवा परीक्षा घेणे हा नसून शिवचरित्र आणि मराठेशाहीच्या इतिहासाचा प्रसार आणि प्रचार करणे हा आहे.**

सप्रेम नमस्कार,

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाची स्थापना लोकमान्य टिळकांच्या पुढाकाराने १८९५ साली झाली. तेव्हापासून मंडळ किल्ले रायगडावर शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम आयोजित करीत आहे. मंडळाच्याच प्रयत्नाने किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार १९२६ साली करण्यात आला. शिवचरित्र आणि मराठेशाहीच्या इतिहासाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी मंडळ सातत्याने प्रयत्न करीत आहे.

साडेतीनशे वर्षांपूर्वी शिवरायांनी अन्यायी, अत्याचारी, धर्मांध सत्तांशी संघर्ष करून एक आदर्श, लोककल्याणकारी स्वराज्य निर्माण केले. शेकडो वर्षांच्या सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून समाज आणि राष्ट्राला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. शिवरायांनी स्वतःच्या त्यागमय जीवनाचा आदर्श सर्वांसमोर ठेवून समाजाला आदर्शाकडे नेले. शिवरायांनी भयमुक्त, भ्रष्टाचारमुक्त आणि दहशतमुक्त समाज निर्माण केला. शिवरायांच्या पश्चात दिल्लीपती मुघल बादशहा औरंगजेब लाखोंचे सैन्य घेऊन छोटेसे स्वराज्य जिंकण्यासाठी महाराष्ट्रात आला. त्यावेळी छत्रपती संभाजीमहाराज, छत्रपती राजाराममहाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली सत्तावीस वर्षे मराठ्यांनी संघर्ष करून हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. हा मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्याचा देदीप्यमान इतिहास शिवरायांच्या इतिहासासारखाच आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहे.

औरंगजेबाच्या निधनानंतर मराठ्यांनी अटकपासून कटकपर्यंत साम्राज्य निर्माण शिवरायांचे स्वप्न साकार केले. ह्या प्रेरणादायी इतिहासाचा प्रसार आणि प्रचार करून आम्हांला उद्याचा आदर्श आणि गौरवशाली हिंदुस्थान निर्माण करता येईल. याच ध्येयाने श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी देशव्यापी शिवचरित्र स्पर्धेचे आयोजन करीत आहे. या स्पर्धेसाठी आवश्यक असणारे शिवचरित्र आणि मराठेशाहीचा समग्र इतिहास ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञांकडून लिहून घेऊन ते ग्रंथ मंडळाने प्रसिद्ध केले आहेत. मागील वर्षी आम्ही एका महाराष्ट्रव्यापी स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यातील ४,५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यातील विजेत्यांना शिवपुण्यतिथीदिनी रायगडावर सन्मानित केले होते. पुढील काळात संपूर्ण देशपातळीवर विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.

या स्पर्धेसाठी मंडळाने डॉ. केदार फाळके लिखित 'छत्रपती शिवाजीमहाराज' आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे आणि इतिहास अभ्यासक श्री. सुधीर थोरात यांनी संपादित केलेल्या 'स्वराज्यरक्षणाचा लढा' या ग्रंथांची निर्मिती केली आहे. या ग्रंथांमधून आपल्या देदीप्यमान इतिहासाचे आकलन होईल.

**'छत्रपती शिवाजीमहाराज'** आणि **'स्वराज्यरक्षणाचा लढा'** हे दोन्हीही ग्रंथ प्रत्येक भारतीयाच्या संग्रही असावेत असे आहेत. विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी सर्व शिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालये आणि पालकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आमच्या या प्रयत्नाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यावा ही विनंती.

आपला विनित,
**सुधीर श्रीरंग थोरात**
कार्यवाह, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे

## स्पर्धेचा अभ्यासक्रम

### इयत्ता सातवी, अकरावी, बारावी आणि डिप्लोमा (तीन वर्षे)

युवा इतिहास संशोधक डॉ. केदार फाळके यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. गजानन मेहेंदळे आणि श्री. पांडुरंग बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांकरीता 'छत्रपती शिवाजीमहाराज' या ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता दिला जाईल. त्यावर ही स्पर्धा आयोजित केली जाईल.

### इयत्ता आठवी ते दहावी आणि वरिष्ठ महाविद्यालय (इ. बारावीपुढील सर्व अभ्यासक्रम)

ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे आणि इतिहास अभ्यासक श्री. सुधीर थोरात यांनी 'स्वराज्यरक्षणाचा लढा' हा ग्रंथ संपादित केला आहे. हा ग्रंथ विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता दिला जाईल. त्यावर ही स्पर्धा आयोजित केली जाईल.

स्पर्धेची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांचा वयोगट आणि त्यांच्या शैक्षणिक पात्रतेवर (इयत्तेवर) आधारित वेगवेगळी असणार आहे. 'छत्रपती शिवाजीमहाराज' या ग्रंथावर आधारित इ. सातवीची प्रश्नपत्रिका आणि इयत्ता अकरावी, बारावीच्या तसेच डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांसाठीची प्रश्नपत्रिका वेगवेगळी असणार आहे. तसेच 'स्वराज्यरक्षणाचा लढा' या ग्रंथावर आधारित इ. आठवी ते दहावीची प्रश्नपत्रिका आणि वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीची प्रश्नपत्रिका वेगवेगळी असणार आहे.

DRAFT

## स्पर्धेचे स्वरुप

१) स्पर्धेचे शुल्क रु. १५०/- असेल. त्यामध्येच **'छत्रपती शिवाजीमहाराज'** आणि **'स्वराज्यरक्षणाचा लढा'** हे ग्रंथ विद्यार्थ्यांच्या गटाप्रमाणे देण्यात येतील.

२) स्पर्धा लिखित स्वरुपाची असेल. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतंत्र उत्तरपत्रिकेवर गोल रंगवून द्यावयाची आहेत.

३) स्पर्धा केवळ मराठी माध्यमातूनच घेतली जाईल.

४) प्रश्नपत्रिका १०० गुणांची असेल. प्रश्नपत्रिकेत ५० प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नाच्या योग्य उत्तरास २ गुण दिले जातील. प्रश्न सोडविताना विद्यार्थ्यांनी निळ्या किंवा काळ्या बॉलपेनचा वापर करावा.

५) परिक्षा केंद्र स्तरावर होईल. किमान १०० विद्यार्थी ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी केंद्र बनविले जाईल.

६) आदर्श उत्तरपत्रिका स्पर्धेनंतर सुमारे एक आठवड्यानंतर श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या www.shivajiraigad.com या website वर दिली जाईल तसेच स्पर्धेचा निकालही साधारणपणे दि. १५ मार्च २०२० च्या सुमारास वेबसाईटवर जाहीर केला जाईल. उत्तरपत्रिकेची दुसऱ्यांदा गुण पडताळणी केली जाणार नाही.

७) किमान ३ केंद्रे असलेल्या तालुक्यात प्रथम येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना किल्ले रायगडावरती दुसऱ्या फेरीसाठी बोलविले जाईल. दि. ३० मे २०२० रोजी श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या १२५ व्या वर्धापन दिनानिमित्त या सर्व विद्यार्थ्यांची दुसरी लेखी स्पर्धा होईल. ही स्पर्धा प्रसंग वर्णनात्मक असेल. या स्पर्धेतून जिल्ह्याचा प्रथम क्रमांक काढण्यात येईल. जिल्ह्यातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा मुलाखत घेऊन किंवा वक्तृत्व स्पर्धा घेऊन त्यामधून महाराष्ट्रातील प्रथम ३ विजेते काढले जातील. रायगडावरील फेरीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना सविस्तर तपशील नंतर कळविला जाईल.

## पारितोषिक योजना

१) शालेय विद्यार्थी वयोगट (इ. सातवी ते दहावी) यामध्ये केंद्रात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ३०१ इतके रोख पारितोषिक दिले जाईल. महाविद्यालयीन विद्यार्थी वयोगट (अकरावी, बारावी, डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर) यामध्ये केंद्रात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१ इतके रोख पारितोषिक दिले जाईल.

२) प्रत्येक वयोगटांमध्ये जिल्ह्यात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. १५०१/- इतक्या रुपयांचे रोख पारितोषिक दिले जाईल.

३) प्रत्येक वयोगटामध्ये महाराष्ट्रात प्रथम येणाऱ्या ३ विद्यार्थ्यास रु. ५००१/-, रु ३००१/-, रु.१००१/- इतक्या रुपयांची रोख पारितोषिके रायगडावरती विशेष कार्यक्रमात दिली जातील.

४) केंद्र किंवा तालुका या ठिकाणी पहिल्या क्रमांकाची निवड करीत असताना एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांस समान गुण मिळाल्यास संगणकीय लकी ड्रॉ पद्धतीने त्यापैकी पहिल्या विद्यार्थ्याची निवड केली जाईल. याबाबतचा अंतिम निर्णय श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचा राहील.

५) स्पर्धेस उपस्थित राहाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रशस्तिपत्रक देण्यात येईल.

६) केंद्रातील ज्या वयोगटात किमान ४० विद्यार्थी असतील त्या वयोगटासाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दिले जाईल. पारितोषिकासाठी विद्यार्थ्यांची निवड करताना ती विद्यार्थी संख्येनुसार करण्याचा अधिकार श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाकडे राहील.

## स्पर्धेचे व निकालाचे वेळापत्रक

१) स्पर्धा शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२० रोजी होईल.

२) स्पर्धेची वेळ - सकाळी ११.०० ते १२.०० पर्यंत असेल.

३) सकाळी १०.३० वाजता विद्यार्थ्यांनी स्पर्धा केंद्रावरती उपस्थित राहणे आवश्यक आहे.

४) स्पर्धेचा निकाल दि. १५ मार्च २०२० नंतर मंडळाच्या www.shivajiraigad.com या website वर जाहीर केला जाईल आणि दि. ३१ मार्च २०२० पूर्वी शाळेमध्ये प्रशस्तिपत्रके तसेच केंद्र स्तरावरची रोख पारितोषिके देण्यात येतील.

## स्पर्धेत कोणाला भाग घेता येईल?

१) सर्व शाळांमधल्या इ. सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील तसेच पदव्यूत्तर विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेता येईल.

२) विद्यार्थ्यांचे पूर्ण भरलेले अर्ज आणि शुल्क विहीत मुदतीत श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाकडे पाठवावे.

३) किमान १०० विद्यार्थी ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी केंद्र बनविले जाईल. केंद्राचा तपशील तसेच बैठक क्रमांक व बैठक व्यवस्था दि. ५ फेब्रुवारी २०२० नंतर मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

**४) अर्ज आणि नियमित शुल्क रु. १५०/- स्वीकारण्याची अंतिम मुदत - दि. २१ डिसेंबर २०१९ आणि विलंब शुल्क अतिरिक्त रु. २०/- (एकूण रु. १७०/-) यासह दि. २८ डिसेंबर २०१९ अशी राहील.**

---


## श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
१३६० शुक्रवार पेठ, भारत भवन-ब, पुणे - ४११००२ दूरध्वनी: ९३०७ ६५ ४५ ८९
ई-मेल: shivcharitraspardha@gmail.com website: www.shivajiraigad.com


(नोंदणी क्र. एफ - ५२)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | VII | XI | XII | Diploma | |
| छत्रपती शिवाजीमहाराज | ☐ | ☐ | ☐ | ☐ | |
| | VIII | IX | X | Grad. | Post Grad. |
| स्वराज्यरक्षणाचा लढा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |

## शिवचरित्र स्पर्धा - नोंदणी अर्ज

IN DEVNAGARI (मराठी)

SURNAME

NAME

FATHER'S NAME

RESI ADDRESS

AT POST TAL

DIST PIN

MOBILE EMAIL

NAME OF THE SCHOOL

ADDRESS

VILLAGE/TOWN/CITY TAL DIST. PIN

EMAIL OF THE SCHOOL MOBILE NO. OF THE SCHOOL IN-CHARGE

STUDENT'S/PARENTS SAVING A/C NO. BANK

BRANCH ISFC CODE

MOBILE NO. OF ACCOUNT HOLDER

**CERTIFICATE FROM THE INSTITUTE**

This is to certify that Miss/Mr. ____________ is a bonafide student of this school / college studying in Std. ______ Div. ______ or Course ____________ in the year 20 - 20

SEAL OF THE INSTITUTION

SIGNATURE OF THE HEADMASTER / PRINCIPAL & SEAL

---


## श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
१३६० शुक्रवार पेठ, भारत भवन-ब, पुणे - ४११००२ दूरध्वनी: ९३०७ ६५ ४५ ८९
ई-मेल: shivcharitraspardha@gmail.com website: www.shivajiraigad.com

(नोंदणी क्र. एफ - ५२)


दिनांक: ____________

कु. ____________________ यांजकडून शिवचरित्र स्पर्धा २०२० यासाठी एकूण रु. १५०/- (रु. एकशे पन्नास फक्त) शुल्क मिळाले.

मंडळाकडे शुल्क जमा करणाऱ्याचे नाव ____________ मोबाईल ____________

मंडळाकडे शुल्क जमा करणाऱ्याची सही ____________